
ISBN No. 978-93-83813-33-9

# मराठी साहित्याचा आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष



प्रधान संपादक

डॉ. एस. जे. पवार | प्रा. धन्यकुमार बिराजदार

सहायक संपादक

प्रा. गंगाधर गेंड | डॉ. परमेश्वर पाटील

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका

| लेखाचे नाव | पान नं. |
| --- | --- |
| १. बसवेश्वर: स्त्री मुक्ति चळवळ – डॉ. एस.जे. पवार | १ |
| २. महात्मा बसवेश्वर : सामाजिक समतेचे प्रणेते – प्रा.धन्यकुमार जिनपाल बिराजदार | ९ |
| २. सामाजिक क्रांतीचे प्रेरणास्त्रोत : संत तुकाराम – डॉ. एस. जे. जहागिरदार | १४ |
| ३. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथासाहित्यातील स्त्री जीवन – प्रा. गंगाधर म. गेंड | २० |
| ४. मराठीला जागतिक स्थान देणारे : राजर्षी शाहू महाराज – डॉ. श्रीपती म.रायमाने | २९ |
| ५. बहिणाबाईंचे मराठी साहित्याला योगदान – प्रो : नर्मदा र कुराडे. | ३४ |
| ६. कुसुमाग्रजांचे वैश्विक साहित्याला योगदान – प्रा. चारूदत्त भा. कासार | ४० |
| ७. भारतीय साहित्यातील संक्षिप्त शेतकरी जीवन – डॉ.बापुराव व्ही. पाटील | ४७ |
| ८. समाजजीवन–लोकजीवनाचे प्रतिबिंब : लोकसाहित्य – परमेश्वर म. पाटील | ५५ |
| ९. मराठी भाषा– बाल साहित्य – प्रा. विदया एस. हिरेमठ | ६३ |
| १०. मराठी दलित कविता : आंबेडकरी विचारधारा – डॉ.पी.एम. पाटील | ६९ |
| ११. जागतिकीकरण आणि मराठी – प्रा.डॉ. अमित शिवाजीराव | ७८ |
| १२. मराठी भाषेची स्थिती गती – प्रा. अलका आ. मुतगेकर | ८१ |
| १३. बहिणाबाई मराठी साहित्याची आई – नताशा अनिल गायकवाड | ९२ |
| १४. "दलित साहित्य व अण्णाभाऊ साठे" – आरती रा. चव्हाण | ९५ |
| १५. "लोकसंपर्क माध्यम आणि हिंदी" – प्रा. नीता पाटील | ९८ |

Scanned with CamScanner

# नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथासाहित्यातील स्त्री जीवन

प्रा. गंगाधर म. गेंड

१९८० नंतरच्या मराठी साहित्यिक, समीक्षक म्हणून डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचे नाव घेतले जाते. त्यांनी कथा, कविता, कादंबरीबरोबर ग्रामीण आणि दलित साहित्याची समीक्षा वेगळ्या पध्दतीने करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे मराठी कथासाहित्यातील योगदान भरीव असेच आहे. त्यांचे एकूण सात कथासंग्रह प्रसिध्द झाले आहेत. या कथासंग्रहातून मराठवाड्यातील स्त्री जीवनाचे चित्रण आले असून तेथील मातीचा सुगंध त्यांच्या कथेतून अनुभवायास मिळतो. कोत्तापल्ले हे मराठवाड्यातील स्त्री जीवनाचे चित्रण करतात तेव्हा स्त्री जीवनाचे विविध कंगोरे उलघडत जातात. त्यांच्या या वास्तवस्पर्शी चित्रणातून तेथील ग्रामीण स्त्री जीवनाचे वास्तविकतेचे आकलन होते. कोत्तापल्ले हे स्त्री जीवनाचे भान ठेऊन लेखन करणारे साहित्यिक असून मराटवाडयातील स्त्री जीवनाचे दर्शन त्यांच्या कथांतून सहजतेने घडते.

आजच्या स्त्री मुक्तीच्या वैज्ञानिक प्रगतीच्या काळातही ती पूर्णपणे मुक्त झाली नाही. स्त्रीसाठी 'चूल' आणि 'मूल' हे पूर्वीच्या काळापासून चालत आलेले नियम. या नियमात कोंडून तिच्यावर मानसिक गुलामगिरी लादली आहे. माणूस म्हणून आजही तिच्या भावना जपल्या जात नाहीत. स्त्री म्हणून तिला दुय्यम स्थानच आहे.



Scanned with CamScanner

काही स्त्रिया पुरूषांच्या बंधनातून मुक्त झाल्या आहेत, असे जरी दिसत असले तरी एकूणच स्त्रीवर्ग पुरूष संस्कृतिच्या गुलामगिरीतच जगतो आहे हे सत्य आहे. स्त्रीयांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराच्या व गुलामगिरीच्या समस्येचे मूळ नेमके कशात आहे याचे निदान उपर्युक्त विधानातून स्पष्टपणे जाणवते. स्वतःला सुसंस्कृत म्हणवणारा समाज कसा सुसंस्कृत नाही उलट संस्कृतिच्या नावाखाली तो विकृतीचे पालन करतो हे प्रस्तुत विधानातील सत्य सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे.

**'स्त्रियश्चरित्रं पुरूषस्य भाग्यं देवो न जानति कुतो मनुष्य'** या संस्कृत वचनानुसार स्त्रियांचे चरित्र देवही जाणू शकत नाही हे खरे परंतु अनादी काळापासून ते वर्तमान काळापर्यंत स्त्रीवर होणारे अन्याय-अत्याचार सारा संसार जाणतो. स्त्रीला समजूण घेताना तिचे मन समजावून घेणे आवश्यक आहे परंतु स्त्रीचे मन, तिचे प्रश्न या व्यवस्थेत विचारासाठी देखील स्विकारले जात नाहीत ही वस्तुस्थिति सत्य आहे. डॉ. तारा भवाळकर म्हणतात ''स्त्रीला सदैव लैंगिक आक्रमणाच्या भयगंडाच्या दडपणाखाली ठेवून तिचे स्वातंत्र्य, तिचा आणि पुरूषाचाही आनंद आणि तिचे सुख संकुचित करणारा समाज हा खऱ्या अर्थाने कधीही सुसंस्कृत समाज असू शकत नाही. तेथे संस्कार संपन्न असणे म्हणजे भयगंडाखाली ठराविक संकुचित वर्तुळातले जीवन जगणे, इतकाच अर्थ असतो. आणि अशी भूमिका असलेला समाज कधीही सुसंस्कृत नसतो. उलट तो संस्कृतीच्या नावाखाली विकृती पोषीत असतो.''१



Scanned with CamScanner

'गुंता' या कथेमधील अनुराधाबाई ध्येयवेड्या मास्तराची पत्नी आहे. अनुराधाबाई चाणाक्ष, हुशार आहेत. त्या आपल्या पतीला शहणपणाच्या गोष्टी सांगतात. बापूराव पाटलांच्या नादी लागू नये हे सांगताना म्हणतात, ''रागावू नका. बाई माणसाला फारसं कळत नाही पग सांगू का, मला आपलं असं वाटतं, इंग्रजांशी लढण सोपं होते, किती म्हटला तरी ते बाहेरचा शत्रू होता..... बाहेरच्या शत्रूशी लढणं सोपं असते. इथल्या माणसांशी घरातल्या शत्रूंशी लढणं मात्र फार फार अवघड असतं बरं!''२ (नागनाथ कोत्तापल्ले राजधानी, पृ. ८०) आपली बायको फारसं न बोलणारी घर कामात मग्न असलेली पण एवढं चांगलं बोलू शकते याचं त्यांना आश्चर्य वाटते. येथे लेखक स्त्रीचा मनोविकास दाखविलेला आहे.

**'वारसा'** या कथेतील जैतुनबी आयुर्वेदाचार्याची बहीण. लग्न होऊन देशमुख घराण्यात येते आणि तिची त्या ठिकाणी कुंचबणा होते. काम वेळेवर झाल नाही किंवा नको ते तिच्या हातून घडल तर मोठ्या जावा बोलायच्या, 'अरेरे, गलती हो गयी. छोडो जी उसको मालूमही नही बेच्यारीको...... बोलो ना उसको पंढरपूर जाने. जायेगी. हाँ. नाचेगी भी.... वारी की क्या बोलते उसको.... कहाँसे ढुंढके लाये गे माँ इसको.....'३ (नागनाथ कोत्तापल्ले राजधानी, पृ. ३०) असे म्हणून उपहासाने हसायचे. आधी हळूहळू बोलणाऱ्या काम चुकलं तर बोलणाऱ्या जावा, नणंदा, येता-जाता चिडवू लागत. जेवायला बसली की ''झाडपत्ती खिलाव माँ उसको,'' किंवा ये कैसा खायेगा२ज्ञी, वो पुराणपोली खायेगी....'४

Scanned with CamScanner

(नागनाथ कोत्तापल्ले राजधानी, पृ. ३०) असे टोचून बोलायचे. चुलतलं लाकूड चुलीतच गेलं पाहिजे असे म्हणून तिला देशमुखाच्या संसारात तिची आई लोटते. आणि देशमुखांनी तिला भिंतीत चिणून मारले अशी लोकवंदता असते.

जैतुनबीसारख्या निरपराध स्त्रीची ही व्यथा-वेदना स्त्री सुलभ शब्दात मांडण्यात कोत्तापल्लेंना यश आले आहे. ते स्त्रियांची समजदारी व्यक्त करतात आणि तिच्यातून तिचा मनोविश्लेषण व्यक्त करतात.

**'कुंडली'** या कथेमध्ये सुनंदा प्राप्त परिस्थिति लक्षात घेऊन एक तर्क बांधते आणि तो तिला खरा वाटतो. केवळा आपल्या देशमुखीचा मान राखण्यासाठी कुंडली जुळत नाही हा तिचा वडिलांनी केलेला बहाणा असतो. खरे कारण त्याच्या थाटामाटाला शोभेलसं स्थळ घराणं मिळत नाही म्हणून ते मुलीचं लग्न करत नाहीत. आपल्या मोठेपणासाठी त्यांनी हकनाक मुलीचा बळी घेतला असतो.

या कथेमध्ये तारूण्य भावनांचा कोंडमारा चित्रित केलेला आहे. तिची वेडी होण्यापर्यंत मजल चित्रित केलेली आहे. तिच्या कोंडमारा अवस्थेला कारणीभूत काय तर देशमुखी थाट. तोलाओलाच स्थळ घराणं नाही मुलीचं लग्न केलं जात नाही. परिणामतः तिची कोंडमारा होते. सुनंदा भ्रमिष्ट होते. तिच्या अतृप्त भावनांचं दृश्य तिला दिसू लागतात. सुनंदाच्या आईच्या शेवटच्या



Scanned with CamScanner

बाळंपणाची हकिकत सांगून, "मावशी हा माझा नवरा नाही हो शत्रू आहे शत्रू आहे. आदल्या जन्माचा वैरी आहे हो..... वैर साधलयं त्यानं या जन्मी."५ (नागनाथ कोत्तापल्ले राजधानी, पृ.१२०) हे तिच्या आईचे उद्‌गार आहेत. यातून नवरा हाच स्त्रीच्या विदीर्णावस्थेला कसा कारणीभूत आहे ते सांगितले आहे. येथे स्त्रीच्या वेदनेकडे कुणाचे लक्ष्य जात नाही. तिच्या आईला घोड्याच्या तोंडासारखं तोंड असलेलं मूल होतं आणि ती कायमची संपते. स्त्रीच्या विदार्णावस्थेला आलेलं हे विचित्र फळ होय. ओली बाळंतीण भूत होते म्हणून प्रेताला विद्रूप केले जाते. ही स्त्रीची मृत्युनंतरही केलेली घोर विटंबनाच होय.

**'काळोख'** या कथेमध्ये दोन मुलांच्या बलात्कारातून निर्माण झालेली विदार्णावस्थेचे चित्रण करणारी कथा आहे. जे तिच्या संमतीने झालं नाही, ते जेव्हा ती नवऱ्याला सांगते तेव्हा तो घर सोडून जातो. यात तिचा काय अपराधं आहे ? तिचे माणूसपण कोणी लक्षात घेत नाहीत. तिला जाणवते की आपण फक्त मादी आहोत. पुरूष हा त्या मादीचा मालक आहे. तिचं बलात्कारीत जीवन तो समजूच शकत नाही. उलट तिलाच खोचकपणे संशयित प्रश्न विचारतो. सर्वभोग पुरूषांच्या तुलनेत स्त्रीलाच भोगावे लागतात तिचा दोष असो नसो साऱ्या गोष्टीचं खापर तिच्या माथी फोडलं जातं.

**'वंशज'** या कथेमध्ये स्त्रीकडून पुरूष वर्गाची एक रास्त अपेक्षा असते. ती म्हणजे वंश फळला फुलला पाहिजे. स्त्रिला मुलं होणं हिच इतिकर्तव्यता. स्त्री जर घराण्याला वंशज देत नसेल तर ती

कुचकामाची. ती स्त्री सोडून देऊन दुसरी केली जाते यातही तिचा घनघोर कुचंबणाच केली जाते.

**'सावित्रिचा निर्णय'** या कथेमध्ये देखील स्त्रीची अवहेलना कशी करते याचे चित्रण कथाकाराने सावित्रिचा निर्णय मध्य दाखविले आहे. सावित्रीचा आईचा सासू आणि नणंद मिळून खूप छळतात. नवरा आईच्या धाकात असल्यामुळे रडण्याशिवाय ती काहीच करू शकत नाही. सावित्रीच्या आईने तिच्या मनावर पतिव्रत्याषियी विविध गोष्टी बिंबवते. नवऱ्याची सेवा, नवऱ्याच्या व सासु-सासऱ्यांच्या धाकात राहणे, मारपीट झाले तरी न बोलणे अशा अनेक गोष्टी तिने सांगितल्या. सावित्रीच्या पांढऱ्या पायांनी घरावर अनेक अरिष्ट आली असे तिच्या सासूचे नेहमी म्हणणे असे. रंडे, सटवे अशा शब्दांनी ति तिचा अधिक्षेप करी आईचाही उध्दार करी. तिची चुलत सासू सावित्रीची कधी कैवार घ्यायची तेव्हा सासू तिला खडसावून बोलायची 'तुम्ही...... तू मध्ये पडे नको ग रांडे. नवरा गिळून बसली अन् शहाणपणा शिंकवते. माहित आहे तुझे सगळे धंदे.... आता आली आहे मोठी शहाणपणा शिकवविणारी. तुला काय कळतं ग आईचं दुःख. पोट पाणी पिकलं असतं तर तुला कळलं असंत. पण तुला नको होतं ना ते. म्हणून गिळून बसलीस नवऱ्याला.'' ६ (नागनाथ कोत्तापल्ले सावित्रीचा निर्णय, पृ.१५)

'पीळ' या कथेमध्ये मालतीची मनोवस्थेचे चित्रण आहे. घराण्यातील एक विधिपूजा कर्परा नदीच्या घाटाची एक-एक पायरी



Scanned with CamScanner

उतरत आहो असे वाटते, तिची ती भयानक स्थिति...... परंतु देशमुखाला त्याचे काहीच नाही, एखाद्या लष्करी अधिकारीच्या रूबाबाने तो आदेश सोडत जातो.

'शिक्त' या कथेमध्ये वंचला पुत्र प्राप्तीसाठी नागव्याने हनुमानाची पूजा करते, बुवा महाराजांच्या दर्शनाला जाते. इथेही स्त्रीमनावर केलेल्या पारंपारिक समाजाचा जबरदस्त पगडा व त्यातून घडणारे कृत्या ते स्पष्टपणे चित्रित केलेले आहे.

'त्रिशिर्ण आकाशची भगवी माया' या कथेमधील सरस्वतीबाईच्या वाट्याला मुलगा जिवंत आहे पण कधीच भेटणार नाही असा दुःखभोग येतो, छातीवर सवत येते, दुःखाचे संकट अंगावर एकामागून एक कोसळत असतानाही ती बोलत नाही. उलट परिस्थितिचा तटस्थपणे विचार करून सवतीच्या बाजूने सहानुभूती वळविते, 'सवितचा दोष तरी काय? माझ्यासारखाच अश्राप जीव तुम्ही लोकांनी आणलाय या वाड्यात आणि तिने काय म्हणून कुजून-कुजून मरावं?'७ (नागनाथ कोत्तापल्ले, सावित्रीचा निर्णय, पृ. १०१) यातून सरस्वतीबाईच्या मनोवस्थेचे कल्पना येते.

'पर्याय' कोत्तापल्लेंच्या सावित्रीचा निर्णय या कथासंग्रहातील 'पर्याय' कथेतील अनुसया वेळ आली म्हणजे माणसे निधडी होतात तसे तिचे झालले आहे. ती ताठ झाली आणि थोडस जबरंन पतिला म्हणते "उद्या जेवन करा आणि ऑफिसला निघा बरं' नवरा उठत नाही हे पाहून ती पदर खोचते, आणखी,

अतिशय हळुवारपणे रेखाटतात. बंदिस्त ग्रामीण जीवनातील अभावग्रस्तता या दोहोंमुळे ग्रामीण स्त्रीचे दुःख अधिकार गहरे होते कथांतील दुःख एकपदरी पध्दतीने न मांडता तिच्या दुःखाचे सूक्ष्म आणि वेगवेगळे भावनांचे पदर उलघडून दाखवतात.


**संदर्भ ग्रंथ**

१. तारा भवळवकर, उनि. पृ.१०६

२. नागनाथ कोत्तापल्ले राजधानी

३. नागनाथ कोत्तापल्ले, सावित्रीचा निर्णय

४. नागनाथ कोत्तापल्ले, रक्त आणि पाऊस



**प्रा. गंगाधर म. गौड**

एस.बी.कला व के.सी.पी. विज्ञान

महाविद्यालय विजयपूर-५८६१०१




Scanned with CamScanner